॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON

**प्रवेश पात्रता विभाग**

जा.क्र. कबचौउमवि/६/प्रपा/मुमोशि/ ७८ /२०२४ दि. २५.०७.२०२४

**-: अत्यंत महत्वाचे :-**

**प्रति,**

१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था यांचे मा. प्राचार्य/संचालक.

२) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळा/परिसंस्था/विभाग यांचे मा. संचालक/विभागप्रमुख.

**विषय :- उच्च शिक्षण घेणा-या मुलींना मोफत शिक्षण योजनेच्या अमंलबजावणी बाबत.**

**संदर्भ :-** मा.प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्य-२०२४-२५/मुमोशि/३८५३ दि. १९.०७.२०२४

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्र विद्यापीठास प्राप्त झाले असून सदर पत्राची प्रत आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठवित आहोत. सोबत जोडलेल्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ 1990 'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle) जळगाव-४२५००१

आपला विश्वासू,

**सहा. कुलसचिव**
प्रवेश पात्रता विभाग

**सोबत :-** वरीलप्रमाणे

**प्रत माहितीस्तव :-**

१) मा.प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव.
३) मा. कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
४) मा. प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
५) मा. कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.
६) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि., जळगाव.
७) मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि., जळगाव.

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. : ०२५७-२२५७२९७, ४०८ फॅक्स क्र. : ०२५७-२२५८४०३, ४०६
Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon
Telephone Nos. : 0257-2257297, 408 Fax Nos.: 0257-2258403, 406

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे ४११ ००१

web: www.dhepune.gov.in Mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.020/26126939/2970798


क्र.उशिसं/शिष्य-2024-25/मुमोशि/ ३८५३ दि. 19.07.2024

19 JUL 2024

**परिपत्रक**

**विषय :- उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजनेच्या अमंलबजावणी बाबत**

संदर्भ :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिष्यवृ.-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८.०७.२०२४.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, शासन निर्णय दि. ७.१०.२०१७ नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्र निकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुला-मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येतो.

तसेच संदर्भाधिन शासन निर्णयान्वये, व्यावसायिक अभ्यासक्रमास शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process – CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील नविन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेश असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्र शिक्षण विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाकडून वर्ष २०२४-२५ पासून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण या योजनेची अंमलबजावणी करणेकरीता महाविद्यालयांना पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. मुलींना मोफत शिक्षण या योजनेची माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर ठळकपणे प्रसिध्द करावी.
२. महाविद्यालयातील प्रवेश प्रकियेच्या प्रमुखाने प्रवेशावेळी सर्व पात्र मुलींना सदरहू योजनेची सविस्तर माहिती तसेच शिष्यवृत्तीची पूर्वतयारी करणेकरीता आवश्यक कागदपत्रांची माहिती द्यावी.
३. सदरहू योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेकरीता महाविद्यालयामधील जाणकार अध्यापकांची स्कॉलरशिप नोडल ऑफिसर (Scholarship Nodal Officer) म्हणून नेमणूक करण्यात यावी.
४. महाविद्यालयाच्या स्तरावर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांबाबत माहिती होणेकरीता तसेच विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेकरीता स्कॉलरशिप नोडल ऑफिसर (Scholarship Nodal Officer) यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र शिष्यवृत्ती कक्ष निर्माण करण्यात यावा.
५. मुलींना मोफत शिक्षण या योजनेबाबतची सविस्तर माहितीचा फलक महाविद्यालयाच्या दर्शनी भागात लावावा. सदरहू फलक हा महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ तसेच विद्यार्थ्यांच्या दृष्टीक्षेपात ठळकपणे येईल अशा स्वरुपात लावण्यात यावा.

६. शिष्यवृत्ती योजनांचे आवेदन पत्रे सादर करणेबाबत प्रात्यक्षिक प्रशिक्षण (Hands on Training) महाविद्यालयाच्या स्तरावर आयोजित करावे.

७. विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेकरीता महाविद्यालयातील स्कॉलरशिप नोडल ऑफिसर (Scholarship Nodal Officer) यांचा संपर्क क्रमांक दर्शनी भागात लावावा.

वर नमुद केल्यानुसार मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणीबाबत दिलेल्या निर्देशानुसार महाविद्यालयामधील स्कॉलरशिप नोडल ऑफिसर (Scholarship Nodal Officer) यांची नाव, पदनाम व संपर्क क्रमांक याबाबतची माहिती संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडे तात्काळ सादर करावी. तसेच मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणीबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत वेळोवेळी संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना अहवाल सादर करावा. तसेच कोणतीही पात्र विद्यार्थीनी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १६

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये / संस्था.

प्रत :- १. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.

उक्त परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशानुसार मुलींना मोफत शिक्षण या योजनेची अंमलबजवणी करणेकरीता महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात. तसेच योजनेच्या अंमलबजावणीबाबत केलेल्या कार्यवाहीचा वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

प्रत :- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.